सकाळ

सकाळ | सातारा सातारा, शुक्रवार, २० मे २०२२

TODAY

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# डॉ. विजयसिंह सावंत यांना 'रयत'चा पुरस्कार

## शरद पवार यांच्या हस्ते वितरण; बौध्दिक कार्याची घेतली संस्थेने दखल

**पळशी, ता. १९ :** कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांना रयत शिक्षण संस्थेचा 'यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार' संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते नुकताच सातारा येथे पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. विविध संशोधन प्रकल्प, प्रस्तावांच्या माध्यमातून बौद्धिक संपदा आणि उत्पादन हक्क मिळवणारे डॉ. सावंत हे रयत शिक्षण संस्थेतील व शिवाजी विद्यापीठातील एकमेव प्राचार्य ठरले असून, त्यांच्या कार्याची दखल घेऊन



**सातारा : शरद पवार यांच्या हस्ते 'यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार'' स्वीकारताना डॉ. विजयसिंह सावंत.**

संस्थेने त्यांना हा पुरस्कार दिला आहे.

संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते व कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर, दिलीप वळसे-पाटील, खासदार सुप्रिया सुळे, अजित पवार, डॉ. विश्वजित कदम, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठलराव शिवणकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. सावंत यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय भारत सरकारच्या पुणे येथील सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेतर्फे देशभरातून आलेल्या विविध संशोधन प्रकल्प, प्रस्तावांतून यापूर्वीही डॉ. सावंत यांना पर्यावरण विषयक संशोधन प्रकल्पासाठी (मेजर रिसर्च प्रोजेक्ट) एचडीएफसी बँकेकडून ३० लाखांचा अनुदान निधी प्राप्त झाला आहे. अशा प्रकारे बौद्धिक संपदा हक्क आणि उत्पादन हक्क मिळवणारे ते रयत शिक्षण संस्थेतील व शिवाजी विद्यापीठातील एकमेव प्राचार्य ठरले आहेत. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे महाविद्यालय विकास समिती, माजी विद्यार्थी संघटना, ग्रामस्थ, पालक, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर सेवकांनी अभिनंदन केले आहे.